**इतर चौकशी अर्ज क्र. ०१/२०१८**
**सीएनआर नं. एमएचटीएच२२०००००१२०१८**

## नि.क्र. १ खालील आदेश
## दि. ०९/०१/२०१८

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी वसई रोड रेल्वे पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ०१/२०१८ मध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल एक एम.आय. कंपनीचा मोबाईल फोन, मॉडेल नं. एम. आय. ३, आय.एम.ई.आय.नं. ८६३१२२०३८६७३७२७ हा ताब्यात मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाला सरकारी वकिलांनी आक्षेप नोंदविला. संपरिक्षा चालू असताना सदर मुद्देमालाची ओळख साक्षीदाराकडून होणे गरजेचे आहे त्यामुळे सदरील मुद्देमाल देण्यात येवू नये. अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास मुददेमालाच्या मालकी हक्काचे कागदपत्र तपासून मुददेमाल अटींवर देण्यात यावा अशी विनंती सरकारी वकीलांनी केली आहे. सदर अर्जाला तपास अधिकारी यांनी म्हणणे सादर केले की, गुन्हा रजि. क्र. ०१/२०१८ मध्ये अर्जदाराने तिचा मुद्देमाल चोरीला गेल्याबाबतची तक्रार दिलेली आहे व सदर मुद्देमाल जप्त असून अर्जदार यांना योग्य त्या अटी व शर्तीवर परत देण्यास त्यांची काहीएक हरकत नाही.

३. अर्जदारा तर्फे युक्तिवाद ऐकला. अर्जदारातर्फे अर्जाचे समर्थनार्थ तिचे प्रतिज्ञालेख, प्रथम खबरीची प्रत, आधार कार्ड इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

४. दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून, अर्जदाराने दिलेल्या तक्रारीवरून मुद्देमाल हा अर्जदाराच्या ताब्यातून चोरीस गेल्याचे दिसुन येते. गुन्हा रजि क्र. ०१/२०१८ ची नोंद ही अर्जदाराने दिलेल्या तक्रारीवरून करण्यात आलेली आहे. तसेच मुद्देमालाच्या बाबतीत तो तक्रारदाराच्या ताब्यातून चोरीला गेल्याची बाब प्रथमदर्शनी दिसून येते. तपास अधिकारी यांनी सुध्दा तक्रारदाराला जप्त

मुद्‌देमाल परत देण्यास हरकत नसल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्जदाराशिवाय इतर कोणीही जप्त मुद्‌देमालाविषयी हक्क किंवा अधिकार सांगितलेला नाही. एकंदरीत परिस्थितीचा विचार करता प्रकरणाच्या अंतिम निकालापर्यंत अर्जदाराच्या ताब्यात मुद्‌देमाल देणे उचीत होईल. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :—

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर एक एम.आय. कंपनीचा मोबाईल फोन, मॉडेल नं. एम. आय. ३, आय.एम.ई.आय.नं. ८६३१२२०३८६७३७२७ अर्जदारास रक्कम रू. १५,०००/— च्या हमीपत्रावर पुढील अटींवर तात्पुरत्या स्वरूपात ताब्यात देण्यात यावा.

## अटी

अ. सदर मुद्‌देमाल न्यायालय आदेश करील तेव्हा हजर करावा.

ब. सदर मुद्‌देमालाच्या स्वरूपात कोणत्याही प्रकारे बदल करू नये.

क. सदर मुद्‌देमाल कोणालाही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करू नये.

३. प्रस्तुतचे प्रकरण हे गुन्हा क्र. ०१/२०१८ च्या प्रकरणासोबत जोडण्यात यावे.

४. तपास अधिकारी यांना आदेशाबाबत कळविण्यात यावे.

सही/—
**(मा. ये. वाघ)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, विरार.

वसई
दि. ०९/०१/२०१८